॥ वर्ष - 8 । अंक - 68 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥



# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 14 सप्टेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### मुंबईसाठी धोरण निश्चितीबरोबरच जास्तीत जास्त गुंतवणुकीला प्रोत्साहन

# महामुंबईसाठी मंत्रालय?

## ‘जागतिक आर्थिक केंद्रा’साठी नीती आयोगाची राज्य सरकारकडे शिफारस

**। मुंबई । महाईन्यूज**

**मुंबई महानगर प्रदेशाला जागतिक आर्थिक केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी नीती आयोगाने स्वतंत्र मंत्रालय किंवा विभाग सुरू करण्याची शिफारस राज्य सरकारला केली आहे. मुंबईसाठी धोरण निश्चितीबरोबरच जास्तीत जास्त गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे आणि सेवा क्षेत्रांना आकर्षित करणे ही यामागची मुख्य उद्दिष्टे आहेत.**



मुंबई महानगर प्रदेश जागतिक आर्थिक केंद्र म्हणून विकसित करण्याबाबत नीती आयोगाच्या अहवालाचे प्रकाशन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक क्लॉस श्वाब यांच्या उपस्थितीत गुरुवारी करण्यात आले. या अहवालात अनेक महत्त्वाच्या शिफारसी करण्यात आल्या आहेत. मुंबई महानगर प्रदेशासाठी स्वतंत्र मंत्रालय तयार करून सात प्रमुख मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्याची सूचना करण्यात आली आहे. त्यात वित्तीय सेवा, तंत्रज्ञान, स्टार्ट अप आणि नाविन्यपूर्ण क्षेत्र, आरोग्य आणि शिक्षण, माध्यम आणि मनोरंजन, विमानसेवा आणि डेटा केंद्राचा समावेश आहे.

राज्याप्रमाणे केंद्रालाही काही सूचना करण्यात आल्या आहेत. प्रामुख्याने केंद्र सरकारने त्यांच्या मालकीच्या जागा मोकळ्या करून घ्याव्यात, या शिफारशीसह अहवालात केंद्राकडे पाच शिफारशी करण्यात आल्या आहेत. मुंबई पोर्ट ट्रस्टची २५३ हेक्टर जागा विकसित करण्याची सूचनाही अहवालात करण्यात आली आहे. त्यात गृहनिर्माण, हरित विभाग, क्रूझ पर्यटन, रिक्लेमेशन आणि इतर मनोरजनांच्या सुविधा उपलब्ध करून देण्याची शिफारस करण्यात आली आहे. मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेवर पुनर्विकासाचा आराखडा तयार करण्यास सांगण्यात आले आहे. या जागांवर प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून घरे बांधण्याची सूचनाही करण्यात आली आहे. मुंबई महानगर प्रदेशात येत्या काळात अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प होऊ घातले आहेत. त्यात प्रामुख्याने वाढवण बंदर, उपनगर रेल्वे कॉरिडोर आणि अलिबाग-विरार मॉडेल कॉरिडोरसारख्या प्रकल्पांच्या कामांचा आढावा ‘प्रगती’ प्रणालीच्या माध्यमातून घ्यावा, अशी सूचना करण्यात आली आहे.

### ‘रेल्वे, संरक्षण दलाच्या जागांबाबतही निर्णय घ्या’

केंद्र सरकारने मुंबईत जास्तीतजास्त गुंतवणूक वाढविण्यासाठी मदत करण्याची शिफारसही अहवालात करण्यात आली आहे. शिवाय रेल्वे, संरक्षण दलाच्या जागा मोकळ्या करण्याची सूचना करण्यात आली आहे. याशिवाय मुंबईतील विविध प्रकल्पांना आवश्यक असणाऱ्या परवानग्या आणि मंजुऱ्या देण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करण्याची सूचनाही करण्यात आली आहे. स्वतंत्र ‘वॉर रूम’मुंबई महानगर प्रदेशाचा विकास करण्यासाठी सरकारचे विविध विभाग, प्राधिकरणे आणि इतर अधिकाऱ्यांच्या आवश्यक समन्वयासाठी स्वतंत्र ‘वॉर रूम’ची स्थापना करण्याची शिफारसही अहवालात करण्यात आली आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महिन्याभरात या ‘वॉर रूम’च्या माध्यमातून कामांचा आढावा घेण्याची शिफारस करण्यात आली आहे.

### बारामतीमध्ये अजित पवारच उमेदवार

## प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचे संकेत; 25 उमेदवार निश्चित?

**। पुणे ।**

**महाईन्यूज । प्रतिनिधी।**



‘अजित पवार यांना बारामतीमध्ये रस आहे. बारामती त्यांचा डीएनए आहे,’ असे नमूद करून ‘अजित पवारच बारामतीचे उमेदवार असतील,’ असे स्पष्ट संकेत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष, खासदार सुनील तटकरे यांनी शुक्रवारी दिले. त्याचप्रमाणे, ‘महाविकास आघाडीच्या जागावाटपाच्या तुलनेत महायुती खूप पुढे गेली असून, जागावाटपाचा तपशील लवकरच जाहीर केला जाईल,’ असेही तटकरे यांनी सांगितले.

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने आयोजित ‘व्हीजन महाराष्ट्र २०५०’ या उपक्रमांतर्गत तटकरे बोलत होते. संघाचे अध्यक्ष सुनीत भावे, सरचिटणीस मीनाक्षी गुरव, उपाध्यक्ष चंद्रकान्त फुंदे या वेळी उपस्थित होते. ‘रस्ते, पायाभूत सुविधा, बंदरे, जीडीपीबाबत महाराष्ट्र देशातील अन्य राज्यांपेक्षा प्रगत आहे. राज्याच्या विकासात सर्वांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

### विरोधकांचे धाबे दणाणले

‘वैयक्तिक लाभाच्या योजना मते मिळविण्यासाठी राबविल्या जात असल्याचा आरोप विरोधक करत असले, तरी या योजनेला मिळणारा प्रतिसाद पाहून विरोधकांचे धाबे दणाणले आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर चंद्र हातात आल्याचे विरोधकांना वाटू लागले होते; पण लाडकी बहीण योजनेमुळे तो चंद्र निसटला. व्यक्तिगत लाभाच्या अशा योजना सवंग लोकप्रियतेच्या वाटू शकतात. मात्र, वंचित लोकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अशा योजनांची गरज आहे. या योजनांमुळे पायाभूत विकासाच्या प्रकल्पांना खीळ बसणार नाही. राज्याचे उत्पन्न वाढत आहे. त्या तुलनेत कर्ज कमी आहे,’ असे तटकरे यांनी स्पष्ट केले.

# मद्यविक्री बंद न झाल्यास पोलिसांवर कारवाई!

## आता सोडणार नाही; कायदा सर्वांना समान : उपमुख्यमंत्री

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आळंदीत मद्यविक्री, वेश्याव्यवसाय यांसारखे प्रकार वाढल्याच्या तक्रारी येत असून, आळंदीत घडणारे हे प्रकार चिंताजनक आहेत. पोलिसांना आवश्यक ती सर्व मदत देण्यात येत असताना असे प्रकार रोखण्याची जबाबदारी कोणाची आहे, असा सवाल करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हे प्रकार बंद न झाल्यास कारवाई करण्याचा इशारा पिंपरी-चिंचवड पोलिसांना दिला.**



आळंदीतील विविध विकासकामांचे भूमिपूजन पवार यांच्या हस्ते गुरुवारी झाले. त्या वेळी ते बोलत होते. आमदार दिलीप मोहिते, तहसीलदार ज्योती देवरे, मुख्याधिकारी कैलास केंद्रे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा निर्मला पानसरे या वेळी उपस्थित होते.मंदिर परिसरात मद्यविक्री, वेश्या व्यवसाय सुरू असल्याची तक्रार काँग्रेस कार्यकर्त्यांनी पवार यांच्याकडे केली होती. या पार्श्वभूमीवर पवार म्हणाले की, श्री संत ज्ञानेश्वर महाराजांसमोर नतमस्तक झाल्याशिवाय आपण पुढे जात नाही. पण, माउलींच्या आळंदीत घडणारे प्रकार चिंताजनक आहेत. पोलिसांना हवे ते दिले जात आहे. पुण्यात सात, तर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयासाठी चार पोलीस ठाणे मंजूर केले आहेत. त्यामुळे असे व्यवसाय बंद करण्याची जबाबदारी कोणाची आहे? इथे असणाऱ्या अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी. हे व्यवसाय बंद झाले नाहीत, तर पोलिसांवर कारवाई केली जाईल. आता सोडणार नाही. कायदा सर्वांना समान आहे. आम्ही कोणताही राजकीय हस्तक्षेप केला नाही, करणारही नाही. पोलिसांनी पोलिसांचे काम करावे.मत-मतांतरे, विचारधारा वेगवेगळी असू शकते. राजकीय पक्षाची व्यक्ती एखाद्या जाती आणि धर्माविरोधात बोलते. त्यामुळे समाजामध्ये तेढ, दुही निर्माण होते. त्यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई केली जाणे शक्य असेल ती केली जाईल, असेही पवार यांनी स्पष्ट केले. भावनेच्या भरात घेतलेल्या निर्णयाचा पश्चात्ताप करण्याची वेळ येते. त्यामुळे भावनिक होऊन कोणता निर्णय घेऊ नका. इतके दिवस काही जणांना प्रेम दिले. आधार दिला. आता आम्हाला आधार द्यावा. चुकलो, तर आमचे कान पकडून जाब विचारा. तुमचा तो अधिकार आहे, असे अजित पवार म्हणाले. आरक्षण मला काढायचे आहे, असे लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी परदेशात जाऊन बोलले, हे लोकांनी लक्षात घ्यावे. लोकसभेला जे झाले ते गंगेला मिळाले. आता विधानसभेला आम्हाला आशीर्वाद द्या. महायुतीत मतभेद होऊ देऊ नका, ज्या पक्षाला जागा जाईल त्या पक्षाचे मनापासून काम करावे, असे आवाहनही अजित पवार यांनी केले.आळंदीत मद्यविक्री, वेश्याव्यवसाय यांसारखे प्रकार वाढल्याच्या तक्रारी येत असून, आळंदीत घडणारे हे प्रकार चिंताजनक आहेत. पोलिसांना आवश्यक ती सर्व मदत देण्यात येत असताना असे प्रकार रोखण्याची जबाबदारी कोणाची आहे, असा सवाल करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हे प्रकार बंद न झाल्यास कारवाई करण्याचा इशारा पिंपरी-चिंचवड पोलिसांना दिला.. हे व्यवसाय बंद झाले नाहीत, तर पोलिसांवर कारवाई केली जाईल. आता सोडणार नाही. कायदा सर्वांना समान आहे. आम्ही कोणताही राजकीय हस्तक्षेप केला नाही, करणारही नाही. पोलिसांनी पोलिसांचे काम करावे.

### आता आम्हाला आधार द्यावा

मत-मतांतरे, विचारधारा वेगवेगळी असू शकते. राजकीय पक्षाची व्यक्ती एखाद्या जाती आणि धर्माविरोधात बोलते. त्यामुळे समाजामध्ये तेढ, दुही निर्माण होते. त्यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई केली जाणे शक्य असेल ती केली जाईल, असेही पवार यांनी स्पष्ट केले. भावनेच्या भरात घेतलेल्या निर्णयाचा पश्चात्ताप करण्याची वेळ येते. त्यामुळे भावनिक होऊन कोणता निर्णय घेऊ नका. इतके दिवस काही जणांना प्रेम दिले. आधार दिला. आता आम्हाला आधार द्यावा. चुकलो, तर आमचे कान पकडून जाब विचारा. तुमचा तो अधिकार आहे, असे अजित पवार म्हणाले. आरक्षण मला काढायचे आहे.

# पूल ३२ कोटींचा आणि सुशोभीकरणावर २० कोटी

## सुशोभीकरण करण्यासाठी नगरसेवकांनी पालिकेकडे पाठपुरावा केला

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महापालिकेच्या वतीने सांगवी-बोपोडी असा मुळा नदीवर पूल बांधण्यात येत आहे. पुलाचे काम अंतिम टप्प्यात असून, त्यासाठी ३२ कोटी ३६ लाखांचा खर्च करण्यात आला आहे. आता पुलाच्या सुशोभीकरणावर आणखी २० कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.**



या पुलासाठी ३२ कोटी ३६ लाखांचा खर्च करण्यात आला आहे. हे काम टी अँड टी इन्फ्रा लिमिटेड कंपनी करत आहे. कामाची मुदत दोन वर्षे होती. मात्र, पुण्याकडील राष्ट्रीय कृषी संशोधन केंद्राची जागा मिळण्यास विलंब झाल्याने ठेकेदाराला ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. सप्टेंबर महिन्याचे पंधरा दिवस झाले तरी अद्याप पुलाचे काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे रहदारी सुरू करण्यात आली नाही. असे असताना पुलाच्या सुशोभीकरणासाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. केवळ सुशोभीकरणावर १९ कोटी ६३ लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत. या खर्चास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहराला जोडणारा हा पूल आहे. त्यामुळे पुलाचे उत्तमरीत्या सुशोभीकरण करण्यासाठी माजी महापौर आणि माजी नगरसेवकांनी महापालिकेकडे पाठपुरावा केला आहे. त्यानुसार पुलाचे संकल्पचित्र व प्राथमिक आराखडा बनविण्यात आला. त्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर २५ ऑगस्टला सादरीकरण करण्यात आले.

### पुलाकडे जाणारे रस्ते अरुंद

या नवीन पुलाकडे जाणारे सांगवीतील सर्व रस्ते अरुंद आहेत. पुलाकडे जाण्यासाठी सांगवीतील ममतानगर, दत्त आश्रम मठ, प्रियदर्शनीनगर, पवनानगर, मुळानगर हे रस्ते आहेत. ते सर्व अरुंद आहेत. पुणे शहराकडून ये-जा करणारी वाहतूक रहदारी मोठी असणार आहे. त्यामुळे अंतर्गत अरुंद रस्त्यांवर वाहतूककोंडीची समस्या निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.महापालिकेच्या वतीने सांगवी-बोपोडी असा मुळा नदीवर पूल बांधण्यात येत आहे. पुलाचे काम अंतिम टप्प्यात असून, त्यासाठी ३२ कोटी ३६ लाखांचा खर्च करण्यात आला आहे. आता पुलाच्या सुशोभीकरणावर आणखी २० कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.

## आरक्षणाला विरोध असणाऱ्या

# राहुल गांधी यांचा खरा चेहरा जगासमोर येतोय!

## शंकर जगताप : पिंपरीत भाजपचे काळ्या फिती बांधून आंदोलन

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**अमेरिकेच्या चालू दौऱ्यात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारतीय लोकशाहीवर टीका करून देशातील सामाजिक आरक्षण रद्द करण्याचा निर्णय घेण्याबाबत वक्तव्य केले. या घटनेच्या निषेधार्थ पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक भागात पिंपरी-चिंचवड शहर (जिल्हा) भाजपा पदाधिकारी व महिला कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांच्या विरोधात काळया फिती बांधून आंदोलन केले. भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले.**




यावेळी, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष व माजी खासदार अमर साबळे, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, आमदार अमित गोरखे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य माऊली थोरात, महेश कुलकर्णी, मोरेश्वर शेडगे, भाजपा सरचिटणीस नामदेव ढाके, विलास मडेगिरी, शितल शिंदे, अजय पाताडे, भाजपा उपाध्यक्ष तथा प्रवक्ते राजू दुर्गे, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, युवा मोर्चा अध्यक्ष तुषार हिंगे, अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष मनोज तोरडमल, डॉ. संजीवनी पांड्ये, माजी नगरसेवक सुरेश भोईर, सागर आंगोळकर, संतोष कांबळे, उषा मुंढे, शेखर चिंचवडे, सोमनाथ भोंडवे, संतोष तापकीर, ॲड. प्रवीण सिंह, सतीश नागरगोजे, शिवम डांगे, प्रमिला जवळकर, सीमा बोरसे, आरती सोनवणे, मीनाश्री गायकवाड, दत्तात्रय गायकवाड, ॲड. पांडुरंग कोरके, गणेश ढाकणे, हनुमंत हाके, संतोष तापकीर, दीपक नागरगोजे, देवदत्त लांडे, प्रदीप सायकर, सुरेश भोईर, सुनील कांबळे, सुनील भोजने, नेताजी शिंदे, बाळासाहेब भुंबे, लक्ष्मीराज कांजी, मंजू गुप्ता, दीपाली कारंजकर, अमोल कुचेकर, धरम वाघमारे, संभाजी नाईकनवरे यांच्यासह माजी नगरसेवक – नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

अमेरिका दौऱ्यावर असलेल्या राहुल गांधी यांनी वॉशिंग्टनमधील जॉर्जटाऊन विद्यापीठात विद्यार्थी आणि शिक्षक यांच्याशी संवाद साधताना "भारत देश सामाजिकदृष्ट्या प्रगल्भ झाल्यानंतर देशातील सामाजिक आरक्षण संपविण्याबाबत काँग्रेस पक्ष विचार करेल," असे वादग्रस्त वक्तव्य केले. या वक्तव्याविरोधात देशभरातून संताप व्यक्त केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर शहर भाजपच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले.

शंकर जगताप म्हणाले की, राहुल गांधी यांचे वक्तव्य विषारी आहे. ते पंतप्रधान न झाल्यामुळे निराशेतून देशावर टीका करत आहेत. "लोकशाहीत अन्यायकारक परिस्थितीवर भाजपच्या निवडणूक विजयांना दोष देऊन मतदारांचा अपमान करणे लज्जास्पद आहे. भारताची प्रतिष्ठा खराब करून, राहुल गांधींनी त्यांचा आत्मविश्वास गमावल्याचे दाखवून दिले आहे, असा आरोप जगताप यांनी केला.

भाजपा संविधान बदलणार, असा प्रचार करणारे स्वतः आज संविधान बदलण्याचीच भाषा करत असल्याने काँग्रेसचा खरा चेहरा देशासमोर आला आहे. काँग्रेस जेव्हा निवडणुका हरते तेव्हाच लोकशाही रक्षणाचा कांगावा करतात. राहुल गांधी यांचे खरे रंग आता स्पष्ट झाले आहेत. ते आरक्षण रद्द करण्यासाठी दार उघडत आहेत, अशी टीका जगताप यांनी केली. "भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांनी जातीवर आधारित आरक्षणाला विरोध केला. काँग्रेस पक्षाने नेहरू यांच्यापासून इंदिरा गांधी आणि राजीव गांधींपर्यंत संसदेत मंडल आयोगाला विरोध केला. समाजावर आधारित आरक्षणाऐवजी 'आर्थिक निकषांवर आरक्षण', असा युक्तिवाद करून दीर्घकाळापासून मंडल आयोगाला विरोध केला. सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांवरील अन्यायाचा हा काँग्रेसचा इतिहास आहे, याकडे जगताप यांनी लक्ष वेधले.

भाजप आहे तोपर्यंत कोणीही आरक्षण रद्द करू शकणार नाही, असा पुनरुच्चार करत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजप हा लोकांच्या पाठिंब्याने जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष बनला आहे आणि सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी प्रयत्नशील आहे, असे जगताप यांनी सांगितले. यापूर्वी भारताच्या आण्विक धोरणांवर टीका करणारे अमेरिकन राजकारणी इल्हान ओमर यांच्यासोबत राहुल गांधी यांच्या कथित भेटीवरही त्यांनी टीका केली.

### राहुल गांधी यांच्या फोटोला जोडे मारत निषेध

प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार अमर साबळे यांनी राहुल गांधी यांच्या भारतविरोधी घटक आणि कटकारस्थानांशी असलेल्या कथित संवादाचा तीव्र निषेध केला. "भाजपने राहुल गांधींना शहाणे होण्याचा इशारा दिला आहे. त्यांच्या परदेश दौऱ्यांमध्ये भारताविरुद्ध विषारी टीका करणे थांबवावे," असे त्यांनी सुनावले. राहुल गांधी देशात आल्यावर जर जिल्हयात आले तर त्यांना पाय ठेवू देणार नाही, असा इशाराही साबळे यांनी दिला. काँग्रेस विरोधात जोरदार घोषणाबाजी सुरू असताना भाजपा महिला कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांच्या फोटोला जोडे मारत निषेध व्यक्त केला.

# पिंपरी-चिंचवडमध्ये ऑलिंपिक दर्जाचे खेळाडू घडतील!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा विश्वास, 'स्पोर्ट्स सिटी'चा संकल्पातून क्रीडा क्षेत्राला चालना

। भोसरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील स्थानिक खेळाडुंना कुस्ती, कबड्डी, धनुर्विद्या, नेमबाजी यासह रोविंग, स्केटिंग, बॉक्सिंग अशा नव्या युगातील खेळांमध्ये चमकदार कामगिरी करता येईल, अशा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे शहरात ऑलिंपिक दर्जाचे खेळाडू घडतील, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त; केला.**




आमदार महेश लांडगे यांनी "स्पोर्ट्स सिटी पिंपरी-चिंचवड" या संकल्पनेसंदर्भात पिंपरी-चिंचवडकरांशी सोशल मीडियाच्या माध्यमातून संवाद साधला. यावेळी गेल्या १० वर्षांत त्यांनी उभारलेले महत्त्वाकांक्षी क्रीडा प्रकल्प आणि विकासकामांचा लेखाजोखा मांडला. आमदार महेश लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवडमधील स्थानिक खेळाडुंना हक्काचे व्यासपीठ निर्माण व्हावे. शहरात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा उपलब्ध व्हाव्यात. या करिता आम्ही "स्पोर्ट्स सिटी-पिंपरी-चिंचवड" असा संकल्प केला होता. २०१७ मध्ये सूज्ञ पिंपरी-चिंचवडकरांनी महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला बहुमताने काम करण्याची संधी दिली. त्यामुळे क्रीडा क्षेत्राला चालना देण्यासाठी आम्हाला खऱ्या अर्थाने वाव मिळाला. तत्पूर्वी, स्थायी समितीचा सभापती म्हणून काम करताना महानगरपालिका प्रशासनाचे राज्यातील पहिले स्वतंत्र क्रीडा धोरण तयार करुन आपण अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी आदर्श निर्माण केला होता, ही बाब अभिमानाने नमूद करावी, असे वाटते.

### देवेंद्र फडणवीस यांचे सहकार्य मिळाले..

आमदार लांडगे म्हणाले की, राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि महायुती सरकारच्या सहकार्याने व महानगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून आम्ही आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले. कै. पै. मारुतीराव रावजी लांडगे यांच्या नावाने सुरू केलेल्या या संकुलामध्ये नामवंत पैलवान नरसिंग यादव यांच्या मार्गदर्शनाने सध्या ७० कुस्तीपटू सराव करीत आहेत. तसेच, आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षण केंद्र, आंतरराष्ट्रीय स्केटिंग ग्राउंड, आंतरराष्ट्रीय रोविंग सेंटर, धनुर्विद्या (आर्चरी) प्रशिक्षण केंद्र, राष्ट्रीय रायफल व पिस्तुल नेमबाजी प्रशिक्षण केंद्र, लॉन टेनिस कोर्ट, विविध व्यायामशाळा, विविध जलतरण तलावांचे काम गेल्या १० वर्षांध्ये पूर्ण केले. आपल्या आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षण केंद्रामध्ये जगविख्यात "प्रो-कबड्डी" स्पर्धेतील खेळाडूंनी सराव केला.



भूमिका

# दिवास्वप्नांना स्वागतार्ह तडे!

**सत्ताधाऱ्यांनी विकासाची स्वप्ने पाहणे- दाखविणे गरजेचेच असते, पण या स्वप्नांना वास्तवाचा, प्रबळ इच्छाशक्तीचा आणि प्रामाणिक प्रयत्नांचा आधार नसेल, तर त्या स्वप्नांतून समाज जेवढा लवकर जागा होईल, तेवढे उत्तम...**

शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्यानंतर उसळलेला जनक्षोभ फक्त पुतळ्यापुरता मर्यादित राहात नाही. पायाभूत सुविधांच्या निर्मितीची क्षमता, भ्रष्टाचार हे मुद्देदेखील या आंदोलनामुळे राजकीय पटलावर येतात. याचे कारण आहे पुतळ्याच्या पडण्याला लाभलेली पार्श्वभूमी. ही पार्श्वभूमी राष्ट्रीय महामार्गावर पसरलेल्या खड्ड्यांच्या जाळ्याची, पडणाऱ्या पुलांची, विमानतळाची होती. ही पार्श्वभूमी नसती तरीही महाराष्ट्रात पुतळा प्रश्नावर एवढा जनक्षोभ उसळला असताच. पण साऱ्या देशभर हा मुद्दा चर्चिला जाण्याला पायाभूत सुविधांच्या निर्मितीबद्दल उपस्थित होणारे गंभीर प्रश्न हे एक महत्त्वाचे कारण निश्चितच आहे.२०१४ सालच्या निवडणुकांच्या निकालानंतर देशात विकासासंदर्भात मोठी आशा निर्माण झाली होती, उत्साह होता. अगदी अल्पावधीत भारत विकासाच्या रस्त्यावर भरधाव प्रवास करू लागणार आणि प्रगत देशांच्या पंक्तीत जाऊन बसणार अशी आशा होती. त्याआधीच्या दहा वर्षांत देशाचा सरासरी आर्थिक वृद्धिदर हा स्वतंत्र भारताच्या



इतिहासातील सर्वांत जास्त होता. शेवटच्या दोन वर्षांत तो घसरला तरीही दहा वर्षांतील सर्वोच्च सरासरी वृद्धी दराने लोकांच्या आकांक्षा मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. आणि या आकांक्षांचे प्रतिनिधित्व देशातील तथाकथित मध्यम वर्गाने केले. 'तथाकथित' अशासाठी की स्वत:ला मध्यमवर्ग म्हणवणारा हा वर्ग प्रत्यक्षात देशातील सर्वांत वरच्या आर्थिक थरातील दहा टक्के लोकांमधील आहे. (देशातील ८० टक्के लोकांची प्रति माह प्रति कुटुंब मिळकत ही २० हजार रुपयांपेक्षा कमी आहे). या तथाकथित मध्यमवर्गासाठी प्रगत देशातील जीवनमान खूप लांबचे ध्येय नव्हते. या वर्गातील एक घटक तसे जीवनमान आधीच जगू लागला होता.असे असले तरीही या वर्गाची स्वप्ने, आकांक्षा आणि आर्थिकदृष्ट्या त्यांच्या खाली असलेल्या ८० टक्के लोकांच्या आकांक्षा यात काही भेद नव्हता. बहुपदरी रस्त्यांवरून मोठा टोल भरून फक्त श्रीमंतांच्या मोटारीच धावणार असे नव्हते. याच रस्त्यांमुळे आणि पायाभूत सुविधांमुळे देशात परकीय गुंतवणूक येणार होती आणि या ८० टक्के लोकांना रोजगार मिळणार होते. मोठे उड्डाणपूल, बहुपदरी रस्ते, बुलेट ट्रेन ही देशाच्या आकांक्षांची, स्वप्नांची प्रतीके ठरली, मात्र आता या स्वप्नांना तडे जाऊ लागले आहेत. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पडणे, त्यातील कथित भ्रष्टाचाराची चर्चा सुरू होणे किंवा पावसाळ्यानंतर इतर पायाभूत सेवांच्या गुणवत्तेसंदर्भात, निर्मितीतील भ्रष्टाचारासंदर्भात प्रश्न निर्माण होणे हे ते तडे आहेत. पण भव्य स्वप्नांना एवढ्या अल्पावधीत तडे का जावेत? आपली एक आशा होती की पायाभूत सेवांची जलद निर्मिती करून आपण जागतिक भांडवलाच्या गुंतवणुकीचे सर्वांत आकर्षक स्थान ठरू. कारण ते स्थान क्षी जिनपिंग यांच्या व्यक्तिकेंद्री एकाधिकारशाहीमुळे चीन गमावण्याची शक्यता आहे आणि जागतिक भांडवली बाजार चीनसाठी पर्यायाच्या शोधात आहे, पण दुर्दैवाने ते स्थान आपल्याला प्राप्त करता आलेले नाही.दोन विशिष्ट उद्योगसमूहांना प्राधान्य देण्याचे केंद्र सरकारचे धोरण हे यामागचे एक महत्त्वाचे कारण असल्याची टीका केली जाते. इतरही कारणे आहेत. मुद्दा असा की राजकीयदृष्ट्या ताकदवान नेत्याने काही निर्णय धडाक्यात, नाट्यमय पद्धतीने घेतले आणि देशाच्या विकासाची गती वाढली, असे काही होणार नाही. मार्ग खडतर आहे. प्रतिमांचे तडे हे स्वप्नांचे तडे ठरण्यामागे या खडतर वास्तवाचे होऊ लागलेले आकलन आहे. उत्साह असणे, आकांक्षा असणे ही चांगलीच गोष्ट आहे, पण त्याचा परिणाम म्हणून आपण आता कोठे आहोत याचे भानच सुटणे हे जास्त गंभीर आहे. आणि गेल्या दहा वर्षांत नेमके असेच घडले. आर्थिक महासत्ता, विश्वगुरू या सर्व घोषणांमध्ये आपले वास्तवतेचे भानच हरवले होते. विकासाच्या प्रश्नाच्या जटिलतेचे आकलन करून घेण्यास समाजाचे वैचारिक नेतृत्व करणारा आपला हा तथाकथित मध्यमवर्ग तयारच नव्हता.

## प्रासंगिक »

# दावा, दवा, दुआ!

***शास्त्रकाट्याच्या कसोटीवर निर्माण केलेल्या औषधास दिलेली विक्री परवानगी मागे घ्यायची वेळ सरकारवर आली असल्यास, संबंधितांवर काय कारवाई करणार?***

केंद्र सरकारच्या आरोग्यसेवा महासंचालकांनी प्रेसवू ( PRESVU) नावाच्या द्रावणास आधी नेत्रौषध म्हणून विक्रीची परवनागी दिली आणि नंतर ती मागे घेतली. सरकारचे म्हणणे या 'औषधा'चा प्रचार ज्या पद्धतीने केला जात होता ते पाहता या 'औषधा'चा गैरवापर होण्याचा धोका होता. तो टाळण्यासाठी त्याच्या विक्रीस दिलेली परवानगी मागे घेत असल्याचे या यंत्रणेने स्पष्ट केले. वरील तपशिलात औषध हा शब्द अवतरणात लिहिला याचे कारण आपल्याकडे या संदर्भात सरसकट दिसणारे गैरसमज. तज्ज्ञ वैद्याकाच्या मार्गदर्शनाखाली जे सेवन करायचे असते त्यास 'औषध' म्हणणे अपेक्षित आहे. पपोटाचे, त्वचेचे विकार आदीसाठींची औषधे आपल्याकडे सर्रास किराणा वस्तूप्रमाणे सहज विकली जात असतात. ज्या औषधांस 'डॉक्टरांची चिठ्ठी' आवश्यक नसते.

युक्रेनमधील संघर्षाला अडीच वर्षे होऊनही तो थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनीच गेल्या आठवड्यात शांतता-चर्चेसाठी ब्राझील, 'ग्लोबल साउथ'मधल्या भारत वा ब्राझीलसारख्या देशांकडून मध्यस्थीची कल्पना युक्रेनच्या अध्यक्षांनाही मान्य होणारी आहे.

# ...तरीसुद्धा युक्रेन-शांतता प्रयत्नांत भारत हवाच!

भारताला या शांतता-प्रस्थापन राजनीतीमध्ये खरोखरच मोठे स्थान असेल का, हा प्रश्न आपल्या देशात विचारला जातो. अर्थातच, अशा प्रकारच्या शांतताकार्यात प्रत्यक्ष सहभागी होण्यापूर्वी भारतीय राजनीतिज्ञांना आपल्या क्षमतांचा आणि मर्यादांचाही पक्का अंदाज असणे आवश्यक आहे. 'हे युग युद्धाने प्रश्न सोडवण्याचे नाही' अशी भारताची भूमिका जगजाहीर आणि जगन्मान्यही आहे, पण भूमिका मांडणे निराळे आणि प्रत्यक्ष शांततेसाठी वाटाघाटींत उतरणे निराळे. युक्रेन- रशिया संघर्ष थांबवताना खरी तडजोड ही एका बाजूला अमेरिका व अमेरिकेच्या बाजूने असलेली युरोपीय राष्ट्रे आणि दुसऱ्या बाजूला पुतिन यांचा रशिया यांच्यातच होणार आहे- त्या तडजोडीतून नवी समीकरणे उदयाला येऊ शकतात. हे ओळखूनच आपण या आव्हानाकडे पाहण्याची गरज आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर, १९४५ साली तसेच १९९१ नंतर म्हणजे 'शीतयुद्ध' संपल्यानंतरच्या काळात युरोपची



'घडी बसवण्या'चे काम अमेरिका आणि रशिया यांनी एकमेकांच्या साथीने केलेले असल्याचा इतिहास आधुनिक काळात प्रथमच बदलतो आहे. रशियाला युरोपमध्ये नवी रचना हवी आहे, तर युरोपीय देशांच्या संरक्षण- संस्थात्मकतेची फेररचना करू शकण्याइतकी क्षमता आजही फक्त अमेरिकेकडे आहे. अमेरिकी राष्ट्राध्यक्ष जो बायडेन आणि रशियाचे पुतिन यांची जून २०२१ मध्ये जीनिव्हात झालेली चर्चा जर फिसकटली नसती, तर कदाचित युक्रेन-संघर्ष टळलाही असता, हेदेखील वास्तव आहेच. त्यामुळे अमेरिकेवर बरेच काही अवलंबून आहे आणि येत्या नोव्हेंबरात अमेरिकेमध्ये नवे राष्ट्राध्यक्ष निवडले जातील त्यावरही शांततेची मदार राहील, हे युक्रेनला आणि रशियालाही पुरेपूर माहीत आहे. अमेरिकेतील राष्ट्राध्यक्ष निवडणुकीतच ढवळाढवळ करण्याचे आरोप पुतिन यांच्यावर (२०१६ मध्ये) झालेले होते. तसा प्रकार पुतिन यांनी यंदा पुन्हा केलाच, तरीही युक्रेनचे फार नुकसान होऊ नये या दृष्टीने युक्रेनी राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी आतापासूनच मोर्चेबांधणी सुरू केल्याचे दिसते. झेलेन्स्की पुढल्याच महिन्यात पुन्हा अमेरिकाभेटीस जात आहेत. तिथे न्यू यॉर्कमध्ये, संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेतही त्यांचे भाषण ठरलेले आहे आणि त्याच वेळी अमेरिकेतील अनेक नेत्यांच्या गाठीभेटींतून शांततेसाठी नव्या वाटा शोधण्याचा प्रयत्न ते करणार, हेही उघड आहे.जगातल्या- विशेषत: युरोपातल्या अन्य देशांच्या नेत्यांनीही शांततेसाठी पाऊल पुढे टाकल्याचे गेल्या काही दिवसांत दिसले. जर्मनीचे चॅन्सेलर ओलाफ शोल्झ यांनी गेल्याच आठवड्यात युक्रेनसंघर्ष थांबवण्यासाठी काही सूचना जाहीरपणे केल्या.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मी आता तुम्हाला राज्यपाल करणार

## एकनाथ खडसे : फडणवीसांनी मुलीची शपथ घेऊन मला आश्वासन दिले

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**फडणवीस यांनी मला राज्यपालपदाची ऑफर दिली होती", असा गौप्यस्फोट एकनाथ खडसे यांनी केला आहे. "फडणवीसांनी मला सांगितलं होतं की मी मनापासून प्रयत्न करेन. याशिवाय त्यांनी त्यांच्या मुलीची शपथ घेऊन मला राज्यपालपदाबाबत आश्वासन दिलं होतं" असंही एकनाथ खडसे म्हणाले. खडसे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर त्यांनी भाजपात परतण्याची पूर्ण तयारी केली होती. मात्र पक्षांतर्गत विरोधामुळे त्यांच्यासाठी भाजपाचे दरवाजे उघडले गेले नाहीत. परिणामी खडसे शरद पवार गटात परत गेले. दरम्यान, आता खडसे यांनी दावा केला आहे की महाराष्ट्र भाजपातील वरिष्ठ नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी त्यांना राज्यपालपद देण्याचं आश्वासन दिलं होतं.**





एकनाथ खडसे म्हणाले, "एके दिवशी देवेंद्र फडणवीस यांनी मला बोलावलं, मी त्यांच्याकडे गेलो. तुम्ही प्रसारमाध्यमं म्हणत आहात ज्याप्रमाणे पंकजा मुंडेंना त्यांनी न्याय दिला, त्याप्रमाणे मला न्याय देण्याचा त्यांनी प्रयत्न केला, असं ते मला म्हणाले. फडणवीस मला म्हणाले, मी आता तुम्हाला राज्यपाल करणार आहे. तशी मी वरिष्ठांकडे शिफारस करणार आहे. त्यावर मी त्यांना स्पष्ट म्हणालो, देवेंद्रजी तुम्ही बऱ्याचदा अशी आश्वासनं देता, हे करेन, ते करेन, परंतु तुम्ही ती आश्वासनं पूर्ण करत नाही. त्यामुळे मला खरं सांगा, कारण माझा विश्वास बसत नाही. त्यावर ते मला म्हणाले, आम्ही तुम्हाला राज्यपाल करणार आहोत. मी त्यांना म्हटलं, आनंदाची गोष्ट आहे, मला राज्यपाल केलं तर चांगलंच आहे. परंतु माझा या आश्वासनांवर विश्वास नाही. त्यावर देवेंद्र फडणवीस मला म्हणाले मी माझ्या एकुलत्या एक मुलीची शपथ घेऊन सांगतो आम्ही तुम्हाला राज्यपाल करणार आहोत. हे देवेंद्र फडणवीस यांचे शब्द जसेच्या तसे मी तुम्हाला जाहीरपणे सांगत आहे". एकनाथ खडसे एबीपी माझाच्या माझा कट्ट्यावर बोलत होते.भाजपाचं वरिष्ठ नेतृत्व एकनाथ खडसे यांना अनुकूल आहे. महाराष्ट्रातील त्यांचे संभाव्य प्रतिस्पर्धी देखील त्यांच्या बाजूने आहेत. तरीदेखील त्यांना राज्यपाल पद का दिलं गेलं नाही? किंवा त्यांना भाजपात का घेतलं गेलं नाही? असे प्रश्न निर्माण झाले आहेत. यावर खडसे म्हणाले, या प्रश्नांची उत्तरं मी देऊ शकत नाही. पक्षप्रवेश का झाला नाही, राज्यपाल का केलं नाही हे मला माहिती नाही. त्यांनी जे सांगितलं तेच मी तुम्हाला सांगत आहे. फडणवीस यांनी माझ्या राज्यपालपदाची शिफारस केली होती, असं त्यांनीच मला सांगितलं होतं.फडणवीस यांनी मला राज्यपालपदाची ऑफर दिली होती", असा गौप्यस्फोट एकनाथ खडसे यांनी केला आहे. "फडणवीसांनी मला सांगितलं होतं की मी मनापासून प्रयत्न करेन. याशिवाय त्यांनी त्यांच्या मुलीची शपथ घेऊन मला राज्यपालपदाबाबत आश्वासन दिलं होतं" असंही एकनाथ खडसे म्हणाले. खडसे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर त्यांनी भाजपात परतण्याची पूर्ण तयारी केली होती. मात्र पक्षांतर्गत विरोधामुळे त्यांच्यासाठी भाजपाचे दरवाजे उघडले गेले नाहीत. परिणामी खडसे शरद पवार गटात परत गेले. दरम्यान, आता खडसे यांनी दावा केला आहे की महाराष्ट्र भाजपातील वरिष्ठ नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी त्यांना राज्यपालपद देण्याचं आश्वासन दिलं होतं.

एकनाथ खडसे म्हणाले, "एके दिवशी देवेंद्र फडणवीस यांनी मला बोलावलं, मी त्यांच्याकडे गेलो. तुम्ही प्रसारमाध्यमं म्हणत आहात ज्याप्रमाणे पंकजा मुंडेंना त्यांनी न्याय दिला, त्याप्रमाणे मला न्याय देण्याचा त्यांनी प्रयत्न केला, असं ते मला म्हणाले. फडणवीस मला म्हणाले, मी आता तुम्हाला राज्यपाल करणार आहे. तशी मी वरिष्ठांकडे शिफारस करणार आहे.

### या आश्वासनांवर विश्वास नाही

त्यावर मी त्यांना स्पष्ट म्हणालो, देवेंद्रजी तुम्ही बऱ्याचदा अशी आश्वासनं देता, हे करेन, ते करेन, परंतु तुम्ही ती आश्वासनं पूर्ण करत नाही. त्यामुळे मला खरं सांगा, कारण माझा विश्वास बसत नाही. त्यावर ते मला म्हणाले, आम्ही तुम्हाला राज्यपाल करणार आहोत. मी त्यांना म्हटलं, आनंदाची गोष्ट आहे, मला राज्यपाल केलं तर चांगलंच आहे. परंतु माझा या आश्वासनांवर विश्वास नाही. हे देवेंद्र फडणवीस यांचे शब्द जसेच्या तसे मी तुम्हाला जाहीरपणे सांगत आहे भाजपाचं वरिष्ठ नेतृत्व एकनाथ खडसे यांना अनुकूल आहे.

---

# छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत

## मालवणमध्ये शिवसृष्टी उभारावी : केसरकरांची मागणी

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण येथे त्यांचा १०० फूट उंचीचा पुतळा उभारण्यात यावा. त्याचबरोबर या परिसरात भव्य आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची शिवसृष्टी उभारण्यात यावी, अशी मागणी शालेय शिक्षण तथा मराठी भाषा विभागाचे मंत्री दीपक केसरकर यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे केली आहे.**

मंत्री श्री.केसरकर यांनी मुख्यमंत्री श्री.शिंदे यांची मुंबई सह्याद्री अतिथीगृह येथे प्रत्यक्ष भेट घेऊन यासंदर्भातील विनंतीपत्र तसेच 'ऊर्जा हिंदुत्वाची' या शीर्षकाखाली सविस्तर आराखड्यासह प्रस्ताव सादर केला.मालवण येथे भारतीय नौदलामार्फत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला होता. नुकत्याच घडलेल्या दुर्देवी घटनेमध्ये हा पुतळा कोसळला. यामुळे याच ठिकाणी पुन्हा नव्याने १०० फूट उंचीचा पुतळा उभारण्यात यावा, त्याचबरोबर सध्या ३३ गुंठे जागेवर असलेल्या स्मारकाऐवजी लगतच्या परिसराचा विकास करुन तेथे भव्य दिव्य आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची 'शिवसृष्टी' उभारण्यात यावी, अशी मागणी



श्री.केसरकर यांनी केली आहे. मालवण नगर परिषदेच्या मंजूर सुधारित विकास योजनेनुसार सध्याच्या स्मारकास लागून वाहनतळ, बगिचा आणि पर्यटन सुविधा या करिता आरक्षित आहेत. या जागा एकत्रितरित्या विकसित करुन येथे शिवसृष्टी उभारण्यात यावी. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या सामर्थ्यशाली आरमाराच्या इतिहासाचा उलगडा होईल तसेच येथे जेट्टी निर्माण केल्यास शिवसृष्टीस भेट देणाऱ्या शिवप्रेमींना वर्षानुवर्षे स्वराज्याची प्रेरणा देणाऱ्या मालवण किल्ल्यावर जाण्याची सुविधा निर्माण होईल. ज्यामुळे शिवप्रेमींना छत्रपती शिवाजी महाराजांच्या सामर्थ्यशाली इतिहासाची नव्याने ओळख होऊन ही प्रेरणा राष्ट्र निर्मितीस उपयोगी ठरेल.

### आंतरराष्ट्रीय दर्जाची 'शिवसृष्टी' उभारावी

मुंबई सह्याद्री अतिथीगृह येथे प्रत्यक्ष भेट घेऊन यासंदर्भातील विनंतीपत्र तसेच 'ऊर्जा हिंदुत्वाची' या शीर्षकाखाली सविस्तर आराखड्यासह प्रस्ताव सादर केला.मालवण येथे भारतीय नौदलामार्फत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला होता. नुकत्याच घडलेल्या दुर्देवी घटनेमध्ये हा पुतळा कोसळला. यामुळे याच ठिकाणी पुन्हा नव्याने १०० फूट उंचीचा पुतळा उभारण्यात यावा, त्याचबरोबर सध्या ३३ गुंठे जागेवर असलेल्या स्मारकाऐवजी लगतच्या परिसराचा विकास करुन तेथे भव्य दिव्य आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची 'शिवसृष्टी' उभारण्यात यावी, अशी मागणी श्री.केसरकर यांनी केली आहे.

# सरकारचे शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण पाऊल

## कांदा आणि बासमती तांदळाचे किमान निर्यात मूल्य हटवले!

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मोदी सरकारनं शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचललं आहे. ज्यामुळे शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळाला आहे. सरकारनं कांदा आणि बासमती तांदळासाठी असलेले किमान निर्यात मूल्य काढून टाकलं आहे. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचे निर्यातमार्ग खुल्या पद्धतीनं उपलब्ध होतील, आणि त्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मागणीचा अधिक फायदा मिळू शकेल.**



### निर्यातमार्ग खुल्या पद्धतीनं उपलब्ध

याआधी सरकारने कांद्याच्या दरातील अस्थिरतेला आळा घालण्यासाठी निर्यात मर्यादित केली होती. ज्यामुळे देशांतर्गत किंमती नियंत्रित राहतील. मात्र, यामुळे अनेक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला चांगला भाव मिळत नव्हता. मोदी सरकारनं शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचललं आहे. ज्यामुळे शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळाला आहे. सरकारनं कांदा आणि बासमती तांदळासाठी असलेले किमान निर्यात मूल्य काढून टाकलं आहे. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचे निर्यातमार्ग खुल्या पद्धतीनं उपलब्ध होतील, आणि त्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मागणीचा अधिक फायदा मिळू शकेल.कांद्याच्या किमान निर्यात मूल्याचा निर्णय मागे घेण्यात आला आहे.

कांद्याच्या किमान निर्यात मूल्याचा निर्णय मागे घेण्यात आला आहे. ज्यामुळे शेतकरी आता थेट परदेशात कांदा निर्यात करू शकतील. याआधी सरकारने कांद्याच्या दरातील अस्थिरतेला आळा घालण्यासाठी निर्यात मर्यादित केली होती. ज्यामुळे देशांतर्गत किंमती नियंत्रित राहतील. मात्र, यामुळे अनेक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला चांगला भाव मिळत नव्हता. आता मोदी सरकारच्या या निर्णयामुळे कांदा निर्यात सोपी झाली आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर लाभ होईल. विशेषतः, कांद्याची मोठी मागणी असलेल्या खाडी आणि आशियाई देशांमध्ये याचा मोठा फायदा होणार आहे. विशेषतः कांदा उत्पादक आणि बासमती तांदूळ उत्पादकांसाठी ही मोठी दिलासा देणारी बातमी आहे. यामुळे निर्यात वाढेल, आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. या निर्णयाचे एकूण परिणाम म्हणून, भारतीय शेतकरी आता जागतिक स्तरावर स्पर्धा करू शकतील आणि त्यांना त्याच्या उत्पादनाची योग्य किंमत मिळेल. यामुळे भारताच्या कृषी निर्यातीला एक नवी चालना मिळण्याची शक्यता आहे.बासमती तांदळावरील किमान निर्यात मूल्य काढून टाकल्यामुळे तांदूळ उत्पादक शेतकऱ्यांना देखील याचा लाभ मिळेल. बासमती तांदूळ ही भारताची महत्त्वाची निर्यात वस्तू आहे आणि याची आंतरराष्ट्रीय स्तरावर चांगली मागणी आहे. यापूर्वी सरकारनं बासमती तांदूळ निर्यातीवर मर्यादा घातली होती. आता ती हटविण्यात आली आहे. मोदी सरकारनं घेतलेल्या या निर्णयामुळे शेतकरी वर्गाला थेट आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील संधी मिळतील. जे त्यांच्यासाठी आर्थिकदृष्ट्या मोठा लाभ ठरणार आहे.कांद्याच्या किमान निर्यात मूल्याचा निर्णय मागे घेण्यात आला आहे. ज्यामुळे शेतकरी आता थेट परदेशात कांदा निर्यात करू शकतील. याआधी सरकारने कांद्याच्या दरातील अस्थिरतेला आळा घालण्यासाठी निर्यात मर्यादित केली होती. ज्यामुळे देशांतर्गत किंमती नियंत्रित राहतील. मात्र, यामुळे अनेक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला चांगला भाव मिळत नव्हता. आता मोदी सरकारच्या या निर्णयामुळे कांदा निर्यात सोपी झाली आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर लाभ होईल. विशेषतः, कांद्याची मोठी मागणी असलेल्या खाडी आणि आशियाई देशांमध्ये याचा मोठा फायदा होणार आहे. विशेषतः कांदा उत्पादक आणि बासमती तांदूळ उत्पादकांसाठी ही मोठी दिलासा देणारी बातमी आहे.


यामुळे निर्यात वाढेल, आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. मोदी सरकारनं शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचललं आहे. ज्यामुळे शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळाला आहे. सरकारनं कांदा आणि बासमती तांदळासाठी असलेले किमान निर्यात मूल्य काढून टाकलं आहे. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचे निर्यातमार्ग खुल्या पद्धतीनं उपलब्ध होतील, आणि त्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मागणीचा अधिक फायदा मिळू शकेल. सरकारनं बासमती तांदूळ निर्यातीवर मर्यादा घातली होती. आता ती हटविण्यात आली आहे. मोदी सरकारनं घेतलेल्या या निर्णयामुळे शेतकरी वर्गाला थेट आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील संधी मिळतील. जे त्यांच्यासाठी आर्थिकदृष्ट्या मोठा लाभ ठरणार आहे.कांद्याच्या किमान निर्यात मूल्याचा निर्णय मागे घेण्यात आला आहे. ज्यामुळे शेतकरी आता थेट परदेशात कांदा निर्यात करू शकतील.

# अंदमान-निकोबारच्या राजधानीचं नाव बदललं

## सरकारचा मोठा निर्णय; आता पोर्ट ब्लेअर नावाने ओळखलं जाणार

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी (१३ सप्टेंबर) एक मोठी घोषणा केली. केंद्र सरकारने अंदमान निकोबार बेटांची राजधानी पोर्ट ब्लेअरचं नाव बदललं आहे. पोर्ट ब्लेअर बंदर हे आता ‘श्री विजयपुरम’ या नावाने ओळखलं जाणार आहे.**



### पोर्ट ब्लेअरला कसं जायचं?

मुक्त करण्यासाठीचा मोठा लढा इथेही उभारला होता. हे बेट त्या स्वातंत्र्यलढ्याची साक्ष देत आहे. वीर सावरकर व इतर स्वातंत्र्यसैनिकांनी भारतमातेला गुलामीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठीचा मोठा लढा इथेही उभारला होता. हे बेट त्या स्वातंत्र्यलढ्याची साक्ष देत आहे.पोर्ट ब्लेअर हे भारतातलं एक सुंदर बेट आहे. विशाखापट्टनम, कोलकाता व चेन्नईवरून जहाजाने पोर्ट ब्लेअरला जाता येतं. पोर्ट ब्लेअरला पोहोचण्यासाठी विशाखापट्टनमहून ५६ तास, चेन्नईवरून ६० तास व कोलकात्याहून ६६ तास प्रवास करावा लागतो.

अमित शाह यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की “देशाला गुलामगिरीच्या सर्व प्रतीकांपासून मुक्त करण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदींचा संकल्प आहे. या संकल्पापासून प्रेरित होऊन आज गृह मंत्रालयाने पोर्ट ब्लेअरचं नाव ‘श्री विजयपुरम’ असं ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.‘श्री विजयपुरम’ हे नाव आपला स्वातंत्र्यलढा आणि त्यामधील अंदमान निकोबारचं योगदान दर्शवत राहील”. गृहमंत्री शाह म्हणाले, भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात आणि इतिहासात या बेटाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. चोल सम्राटांनी या बेटांवरच त्यांच्या नौदलाचे तळ उभारले होते. हे बेट भारताच्या सुरक्षेला व विकासाला गती देण्यासाठी सज्ज झालं आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी या बेटावर भारताचा तिरंगा फडकवला होता.

# देशभरातील 10 प्रसिद्ध गणपती!

'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया' असा गणरायाचा जयघोष संपूर्ण भारतात, विशेषतः महाराष्ट्रात, गणेशोत्सवाच्या संपूर्ण १० दिवस आणि रात्री ऐकायला मिळतो. संपूर्ण भारतात गणेशोत्सव उत्साहात साजरा केला जात असताना, महाराष्ट्रातील सार्वजनिक गणेश मंडळांचा उत्साह पाहण्यासारखा असतो. आज आम्ही भारतभरातील १० प्रसिद्ध गणपती मंडळांची माहिती देणार आहोत. खास महाईन्यूजच्या वाचकांसाठी...

## लालबागचा राजा- लालबाग मुंबई

1 ब्रिटिश राजवटीत पहिल्यांदा 'लालबागचा राजा'ची स्थापना झाल्यापासून ८५ वर्षांहून अधिक काळ तो मुंबईत 'राज्य' करीत आहे. 'लालबागच्या राजा'ची स्थापना इ.स. १९३४ साली करण्यात आली होती. कोळी समाजाच्या नवसाला पावलेला म्हणून हा गणपती सर्वप्रथम प्रसिद्ध झाला. मुंबईतील लालबागमध्ये जुन्या काळात मुख्यत्वे विणकर आणि इतर कामगार राहत होते. हे मंडळ मुंबईतील सर्वात सुशोभित असलेल्या मंडळांपैकी एक आहे आणि उत्सवाच्या १० दिवसांमध्ये दररोज सरासरी १५ लाख लोक येथे दर्शनासाठी येतात. लोककथा अशी आहे की, लालबागचा राजा आपल्या भक्तांच्या इच्छा पूर्ण करतो.

## दगडूशेठ हलवाई गणपती- पुणे

2 दगडूशेठ हलवाई गणपती मंडळ हे भारतातील सर्वात जुन्या सार्वजनिक मंडळांपैकी एक आहे. कारण- १८९६ पासून येथे उत्सव साजरा केला जात आहे. दगडूशेठ हलवाई हे कर्नाटकातील मिठाई व्यापारी होते; जे पुण्यात स्थायिक झाले होते. या ठिकाणी बसवलेली गणेशमूर्ती देशातील सर्वात महागडी म्हणून ओळखली जाते. या मूर्तीचा सुमारे एक कोटी रुपयांचा विमा उतरवण्यात आल्याचे वृत्त आहे.

## मुंबईचा राजा- गणेश गल्ली,

3 गणेश सार्वजनिक उत्सवाच्या १० दिवसांत मुंबईतील सर्व रस्ते लालबाग येथील गणेश गल्लीकडे जातात. प्रत्येक वेळी सामाजिक संदेश देणाऱ्या शास्त्रीय मूर्तीसाठी हे मंडळ प्रसिद्ध आहे. मुंबईतील सर्वात जुने मंडळ, असा या मंडळाचा मान आहे. १९२८ मध्ये लालबागमधील गिरणी कामगारांनी गणेश गल्ली मंडळाची स्थापना केली.

## खैरताबाद गणेश- हैदराबाद

4 हैदराबाद हे सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदाने साजरे करणारे आणखी एक शहर आहे. खैरताबाद गणेश मंडळ हे परंपरेने हैदराबादमधील सर्वात मोठे गणेश मंडळ आहे. या वर्षी ही मूर्ती जवळपास १०० फूट उंच असून, त्याची किंमत एक कोटी रुपयांपर्यंत आहे. ही मूर्ती राजस्थानातून आणलेल्या मातीपासून बनवून, सेंद्रिय रंगाने रंगवली जाते.

## कसबा गणपती- पुणे

5 कसबा गणपतीला शिवाजी महाराजांच्या काळापासूनचा इतिहास आहे. शिवरायांची आई जिजामाता यांनी हे मंदिर बांधले. हे गणेशाचे मंदिर असले तरी ते दरवर्षी सार्वजनिक मंडळाद्वारे गणेशोत्सव उत्साहात साजरा केला जातो. लोकमान्य टिळकांनी पुण्यातील सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात कसबा गणपती येथे केली. या मूर्तीला अनेक वर्षांपासून भारतातील सर्वोत्तम मूर्तींपैकी एक म्हणून स्थान देण्यात आले आहे.

## जीएसबी सेवा मंडळ गणपती– किंग्ज सर्कल, मुंबई

6 जीएसबी गणपती ही सलग अनेक वर्षांपासून भारतातील सर्वात श्रीमंत गणेशमूर्ती आहे. दक्षिण भारतीय आणि गुजराती लोकांची वस्ती असलेल्या मुंबईतील किंग्ज सर्कल या ठिकाणी ही मूर्ती प्रतिष्ठापित केली आहे. या मंडळामध्ये दरवर्षी ६५ हजारहून अधिक लोक त्याची पूजा करतात. या सार्वजनिक गणेशमूर्तीची उत्कंठावर्धक बाब म्हणजे १० ऐवजी पाच दिवस पूजाअर्चा केली करून, उत्सवाच्या पाचव्या दिवशी विसर्जन केले जाते.



## गिरगावचा राजा– गिरगाव, मुंबई

7 खेतवाडी व गिरगाव ही गुजराती व मारवाडी लोकसंख्या असलेली व्यापारी क्षेत्रे आहेत. पण, हे समुदाय दरवर्षी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी मूळ महाराष्ट्रीयन लोकांसोबत एकत्र येतात. हे मंडळ विशिष्ट थीमसह उभारले जाते. मूर्तीची रचना सौंदर्यपूर्ण असते. या गणेशोत्सव मंडळाला 'गिरगावचा राजा' होण्याचा मान हक्काने दिला जातो.

## धरमपेठ गणेशोत्सव- नागपूर

8 नागपूरमध्ये जवळपास ६० वर्षांपासून सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जात आहे. पुणे-मुंबईसारखी मंडप व्यवस्था आणि मूर्ती तितकी मोठी नसली तरी धरमपेठ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ हे नागपूरमधील सर्वात मोठे मंडळ आहे. भाविकांची येथे नेहमी गर्दी असते.

## नाशिकचा राजा- नाशिक

9 महाराष्ट्रातील नाशिक हे आणखी एक औद्योगिक शहर आहे. येथे अनेक वर्षांपासून गणेशोत्सव साजरा केला जातो. जरी मंडप आणि उत्सव पुण्याइतका भव्य नसला तरी नाशिकचा राजा हे नाशिकमधील सर्वोत्कृष्ट गणेशोत्सव मंडळ म्हणून ओळखले जाते. घणकर लेन, अशोकस्तंभ, नाशिक येथे या मंडळाचा उत्सव साजरा होतो. उत्सवाच्या दहाव्या दिवशी विसर्जन करण्यापूर्वी १० दिवस मूर्तीची पूजा केली जाते.

## पणजीम, गोवा-गणेशोत्सव

10 गोवा हे अनेक अर्थांनी महाराष्ट्रासारखेच आहे. गोव्यात मराठी लोकसंख्या लक्षणीय आहे. तर, गणेश चतुर्थी हा गोव्यातील लोकप्रिय सण आहे. महाराष्ट्रात हे मंडळ तितके मोठे नसले तरी गोव्यात या गणेश मंडळाचा वाटा आहे. पणजीम येथील सार्वजनिक गणेशोत्सव हे एक असे उदाहरण आहे की, जिथे गणेशमूर्ती लोकांसाठी खुल्या आहेत; ज्यामध्ये १० दिवस दररोज पूजा आणि आरती केली जाते. मडगाव व म्हापसा येथेही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आहेत.

गणेशोत्सव हा भारतातील सर्वात मोठ्या उत्सवांपैकी एक आहे. ज्या भागात गणेशाचे मंडप आहेत, त्या भागात वाहतूक जवळपास ठप्प होते. या मंडळाच्या परिसरात १० दिवस भाविकांची प्रचंड गर्दी असते. हा सण मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यामागची प्राथमिक संकल्पना ही विविध धर्म आणि जातींतल्या लोकांमधील संबंध वाढवणे आणि एकता निर्माण करणे, अशी होती. लोकांनी आापसांतील मतभेद दूर करून गणेश चतुर्थी एकत्रितपणे साजरी करण्याची वेळ आली आहे.

मोरया



गणेश चतुर्थी फक्त महाराष्ट्रातच साजरी केली जाते, असे अनेकांना वाटते; पण ते चुकीचे आहे. कारण- हा संपूर्ण भारताचा सण आहे. म्हणून भारताच्या अनेक भागांमध्ये गणेश चतुर्थी साजरी केली जाते; तर तमिळनाडू आणि इतर दक्षिणेकडील राज्यांमध्ये याच दिवसाला 'विनयगर चतुर्थी' म्हणून ओळखले जाते. हा सण भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील चतुर्थी तिथीला येतो. हा उत्सव १० दिवस चालतो आणि अनंत चतुर्दशी (शुक्ल पक्षाच्या १४ व्या दिवशी) गणेशमूर्तीच्या विसर्जनाने समाप्त होतो. बहुतेक लोक घरी मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करून सण साजरा करतात; तर महाराष्ट्रात मंडळामध्ये महाकाय गणपतीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून, सार्वजनिकरीत्या हा उत्सव साजरा केला जातो. त्यामुळे याला सार्वजनिक गणेशोत्सव म्हणून ओळखले जाते.

# इंडियाचे भावी विराट-रोहित?

## पियुष चावलाने सांगितली गिल आणि गायकवाड दोघांची नावं?

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारतीय संघाचा लेग स्पिनर पियुष चावला याने विश्वास व्यक्त केला आहे की, शुबमन गिल आणि ऋतुराज गायकवाड हे भारतीय क्रिकेट संघाचे पुढचे विराट-रोहित असतील. एका यूट्यूब चॅनलवर दिलेल्या मुलाखतीत चावलाने हे वक्तव्य केले. तो म्हणाला शुबमन आणि ऋतुराज यांच्यात प्रचंड प्रतिभा आहे. तसेच हे दोघे शांत स्वभावासाठी ओळखले जातात. विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी सोडलेला वारसा पुढे नेण्याचे सर्व गुण या दोन्ही खेळाडूंमध्ये आहेत.**



विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. आता ती वेळ दूर नाही जेव्हा हे दोन्ही दिग्गज कसोटी आणि वनडे क्रिकेटमधून निरोप घेतील. अशा स्थितीत भारतीय चाहत्यांच्या मनात एक प्रश्न नक्कीच येत असेल की कोहली आणि रोहितनंतर त्यांची जागा कोण घेऊ शकतं? या प्रश्नाचे उत्तर भारतीय क्रिकेट संघाचा दिग्गज फिरकीपटू पियुष चावलाने देण्याचे काम केले आहे.शुभंकर मिश्राच्या यूट्यूब चॅनलवर बोलत असताना पियुष चावलाने सांगितले की शुबमन आणि ऋतुराज हे टीम इंडियाचे भावी विराट कोहली आणि रोहित शर्मा असतील.कारण विराट कोहली आणि रोहित शर्मासारख्या दिग्गजांची जागा घेणे अशक्य आहे, जसे आजपर्यंत कोणीही सचिन तेंडुलकर आणि सुनील गावसकरसारख्या महान फलंदाजांची जागा घेऊ शकले नाही. मात्र, एक खेळाडू निघून गेल्यावर दुसरा खेळाडू त्याच पद्धतीने कामाचा भार स्वीकारतो हे नक्की.शुभंकर मिश्राच्या यूट्यूब चॅनलवर बोलत असताना पियुष चावलाने सांगितले की शुबमन आणि ऋतुराज हे टीम इंडियाचे भावी विराट कोहली आणि रोहित शर्मा असतील. कारण विराट कोहली आणि रोहित शर्मासारख्या दिग्गजांची जागा घेणे अशक्य आहे, जसे आजपर्यंत कोणीही सचिन तेंडुलकर आणि सुनील गावसकरसारख्या महान फलंदाजांची जागा घेऊ शकले नाही. मात्र, एक खेळाडू निघून गेल्यावर दुसरा खेळाडू त्याच पद्धतीने कामाचा भार स्वीकारतो हे नक्की.पियुष चावला पुढे म्हणाला,"शुबमन गिल हा त्याच्या तंत्रशुद्ध फलंदाजीसाठी ओळखला जातो. तुम्हाला माहित आहे की जर एखादा फलंदाज खराब फॉर्ममधून जात असेल, तर सहसा त्याचे तंत्र कामी येते आणि कठीण परिस्थितीतून बाहेर पडण्यास मदत करते. तुम्हाला आठवत असेल तर, ज्या फलंदाजाकडे उत्तम तंत्र आहे. फार काळ वाईट फॉर्ममध्ये जाणार नाही. त्यामुळे मला वाटतं शुबमन-ऋतुराज हे भावी विराट-रोहित असतील."पियुष चावला पुढे म्हणाला,"शुबमन गिल हा त्याच्या तंत्रशुद्ध फलंदाजीसाठी ओळखला जातो. तुम्हाला माहित आहे की जर एखादा फलंदाज खराब फॉर्ममधून जात असेल, तर सहसा त्याचे तंत्र कामी येते आणि कठीण परिस्थितीतून बाहेर पडण्यास मदत करते. तुम्हाला आठवत असेल तर, ज्या फलंदाजाकडे उत्तम तंत्र आहे. फार काळ वाईट फॉर्ममध्ये जाणार नाही. त्यामुळे मला वाटतं शुबमन-ऋतुराज हे भावी विराट-रोहित असतील."विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. आता ती वेळ दूर नाही जेव्हा

### शुबमन गिल तंत्रशुद्ध फलंदाज

तुम्हाला आठवत असेल तर, ज्या फलंदाजाकडे उत्तम तंत्र आहे. फार काळ वाईट फॉर्ममध्ये जाणार नाही. त्यामुळे मला वाटतं शुबमन-ऋतुराज हे भावी विराट-रोहित असतील."पियुष चावला पुढे म्हणाला, "शुबमन गिल हा त्याच्या तंत्रशुद्ध फलंदाजीसाठी ओळखला जातो. तुम्हाला माहित आहे की जर एखादा फलंदाज खराब फॉर्ममधून जात असेल, तर सहसा त्याचे तंत्र कामी येते आणि कठीण परिस्थितीतून बाहेर पडण्यास मदत करते. तुम्हाला आठवत असेल तर, ज्या फलंदाजाकडे उत्तम तंत्र आहे. फार काळ वाईट फॉर्ममध्ये जाणार नाही.

हे दोन्ही दिग्गज कसोटी आणि वनडे क्रिकेटमधून निरोप घेतील. अशा स्थितीत भारतीय चाहत्यांच्या मनात एक प्रश्न नक्कीच येत असेल की कोहली आणि रोहितनंतर त्यांची जागा कोण घेऊ शकतं? या प्रश्नाचे उत्तर भारतीय क्रिकेट संघाचा दिग्गज फिरकीपटू पियुष चावलाने देण्याचे काम केले आहे.शुभंकर मिश्राच्या यूट्यूब चॅनलवर बोलत असताना पियुष चावलाने सांगितले की शुबमन आणि ऋतुराज हे टीम इंडियाचे भावी विराट कोहली आणि रोहित शर्मा असतील.कारण विराट कोहली आणि रोहित शर्मासारख्या दिग्गजांची जागा घेणे अशक्य आहे, जसे आजपर्यंत कोणीही सचिन तेंडुलकर आणि सुनील गावसकरसारख्या महान फलंदाजांची जागा घेऊ शकले नाही. मात्र, एक खेळाडू निघून गेल्यावर दुसरा खेळाडू त्याच पद्धतीने कामाचा भार स्वीकारतो हे नक्की.शुभंकर मिश्राच्या यूट्यूब चॅनलवर बोलत असताना पियुष चावलाने सांगितले की शुबमन आणि ऋतुराज हे टीम इंडियाचे भावी विराट कोहली आणि रोहित शर्मा असतील.कारण विराट कोहली आणि रोहित शर्मासारख्या दिग्गजांची जागा घेणे अशक्य आहे, जसे आजपर्यंत कोणीही सचिन तेंडुलकर आणि सुनील गावसकरसारख्या महान फलंदाजांची जागा घेऊ शकले नाही. मात्र, एक खेळाडू निघून गेल्यावर दुसरा खेळाडू त्याच पद्धतीने कामाचा भार स्वीकारतो हे नक्की.पियुष चावला पुढे म्हणाला, "शुबमन गिल हा त्याच्या तंत्रशुद्ध फलंदाजीसाठी ओळखला जातो.

# कसोटी मालिकेसाठी टीम इंडिया चेन्नईत दाखल

## विराट-रोहितचा विमानतळावरील VIDEO व्हायरल

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बांगलादेशविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी भारतीय क्रिकेटपटू चेन्नईला पोहोचले आहेत. १९ सप्टेंबरपासून चेन्नईमध्ये कसोटी मालिकेला सुरुवात होणार आहे, त्याआधी टीम इंडियाचे सराव शिबिरही येथे होणार आहे. यासाठी रोहित शर्मा, ऋषभ पंत, केएल राहुल, जसप्रीत बुमराह आणि विराट कोहली हे स्टार खेळाडू चेन्नईला पोहोचले आहेत.**



विराट कोहली आज पहाटे ४ वाजता लंडनहून थेट चेन्नई विमानतळावर पोहोचला, ज्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.स्टार खेळाडू जसप्रीत बुमराह, ऋषभ पंत आणि केएल राहुल विमानतळावर टीम बसमध्ये चढताना दिसले. त्याचवेळी विराट कोहली मोठ्या सुरक्षा व्यवस्थेत विमानतळाबाहेर येताना दिसला. बीसीसीआयने या मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्यासाठी भारतीय संघाची घोषणा केली असून त्यात १६ खेळाडूंना स्थान देण्यात आले आहे. पाकिस्तानवर ऐतिहासिक २-० असा विजय नोंदवल्यानंतर बांगलादेश या मालिकेत

### पहिल्या कसोटीसाठी भारतीय संघ

कोहलीचा यंदाचा फॉर्म काही विशेष राहिला नाही. कोहली टी-२० वर्ल्ड कपमध्येही संघर्ष करताना दिसला होता. श्रीलंका दौऱ्यातही त्याची बॅट तळपताना दिसली नव्हती.टीमरोहित शर्मा (कर्णधार), यशस्वी जैस्वाल, शुबमन गिल, विराट कोहली, केएल राहुल, सर्फराझ खान, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), आर अश्विन, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल , कुलदीप यादव, मोहम्मद सिराज, आकाश दीप, जसप्रीत बुमराह, यश दयाल.

प्रवेश करेल, तर या वर्षाच्या सुरुवातीला मायदेशात झालेल्या कसोटी मालिकेत इंग्लंडला ४-१ ने पराभूत केल्यानंतर टीम इंडियाचा हा पहिलाच कसोटी सामना आहे.यावर्षी जानेवारीतील दक्षिण आफ्रिका दौऱ्यानंतर विराट कोहली पहिल्यांदाच कसोटी संघात पुनरागमन करणार आहे. मुलगा अकायच्या जन्मामुळे तो इंग्लंडविरुद्ध भारताच्या घरच्या कसोटी मालिकेत खेळला नव्हता. अशा परिस्थितीत आता कोहलीला कसोटी क्रिकेटमध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याची मोठी संधी असेल.